महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९

ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :**

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/१०१ दिनांक : 01 NOV 2021

**विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६८/ तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१

२) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६३ व ६४, दिनांक २१ सप्टेंबर, २०२१

३) संचालनालयाचे परिपत्रक क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/८७ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली असून,संदर्भाधिन दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरची योजना काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिताची जाहिरात दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने अर्ज करावयाचे असून, उमेदवारांनी अर्ज करण्याची वाढीव कालमर्यादा दिनांक १ नोव्हेंबर २०२१, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची वाढीव कालमर्यादा दिनांक २ नोव्हेंबर २०२१, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. विद्यार्थ्यांना शेवटची संधी म्हणून सदरची कालमर्यादा वाढवून आता online पद्धतीने अर्ज करण्याची कालमर्यादा दिनांक १ नोव्हेंबर २०२१ वरुन दिनांक ९ नोव्हेंबर, २०२१ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) अशी करण्यांत येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक २ नोव्हेंबर २०२१ वरुन दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त वेळापत्रकानुसार सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज तपासणी व स्विकृती करुन सर्व अर्ज एकत्रित करुन **दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१** रोजी तंत्रशिक्षण संचालनालयात हस्तदेय जमा करण्यांत यावेत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे

२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

३) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगांव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/ औरंगाबाद/अमरावती